## <u>नियमित दिवाणी दावा क्र. ३३/२०२२ मधील निशाणी ०१ खालील आदेश</u>
## <u>(CNR No. MHRT08-000293-2022)</u>

प्रस्तुतचे प्रकरण हे आज रोजी न्यायनिर्णयासाठी नेमण्यात आले आहे. आज रोजी पुकारले असता, दोन्ही पक्षकार व विधीज्ञ गैरहजर. अभिलेखावरुन, केवळ प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांनी कैफियत देवुन दाव्यास हरकत घेतल्याचे दिसुन येते. त्यावरुन, माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र. ५३ अन्वये, वादमुद्दे निश्चीत केल्याचे दिसुन येते.

०२. सदर वाद मुद्दयांमध्ये अनुक्रमांक ०५ कडे ***"Does plaintiff prove that defendants are causing obstruction to her peaceful possession?"*** असा वाद मुद्दा निश्चीत करण्यात आला आहे. दाव्यातील अभिकथन पाहिले असता, परिच्छेद क्रमांक ०१ मधील अनुक्रमांक ०१ ते १२ कडील शेत जमीनी मिळकती व मौजे सोनवडे, ग्रामपंचायत घर क्रमांक ०६–ब हे सामाईक घर या मिळकती दाव्याचा विषय असल्याचे वादीचे अभिकथन आहे. सदर शेत जमीन मिळकती व घर मिळकत यांमध्ये वादीचा १/४ इतका हिस्सा असल्याचे व मौजे सोनवडे, ग्रामपंचायत घर क्रमांक ०६–ब हे सामाईक घरालगत असलेली पडवी व लहान खोल्यांमध्ये वादी तिच्या मुलीसह राहत असल्याचे वादीचे पुढे अभिकथन आहे. दावा मिळकतीतील शांततामय वहीवाटीस प्रतिवादी क्र. ०२ व ०४ यांनी हरकत अडथळा करु नये, असा निरंतर मनाई हुकूम वादीने मागितला आहे. प्रतिवादी क्र. ०२ व ०४ यांनी दाव्यातील मजकुर अमान्य केला आहे. वादी ही सासरी भांडण करुन प्रतिवादी क्र. ०२ व ०४ यांच्या घरात सुमारे ११ वर्षे त्यांच्या परवानगीने मुलीसह राहत असल्याचे सदर प्रतिवादींचे अभिकथन आहे. अशा परिस्थीतीत, सदरचा वाद मुद्दा हा अपुरा दिसुन येतो. ***"Does plaintiff prove that defendants are causing obstruction to her peaceful possession?"*** या वाद मुद्दयामध्ये

पुढे वादीने दिलासा मागितल्यानुसार ***over the Suit properties*** असा अतिरिक्त मजकुर नमुद करुन *defendants ऐवजी defendant Nos. 02 and 04* अशी दुरुस्ती करुन ***"Does plaintiff prove that defendant Nos. 02 and 04 are causing obstruction to her peaceful possession over the Suit properties ?"*** असा वाद मुद्दा दुरुस्त करणे गरजेचे वाटते.

०३. अनुक्रमांक ०७ कडील वाद मुद्दा पाहिला असता, ***"Do defendants No. 1 and 4 prove that plaintiff alongwith her other daughters have relinquished their right in the suit property ?"*** असा वादमुद्दा निश्चीत करण्यात आला आहे. तो प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ यांच्या कैफियतीमध्ये परिच्छेद क्रमांक ०८ कडील मजकुरानुसार निश्चीत केल्याचे दिसुन येते. सदर परिच्छेद क्र. ०८ मध्ये प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ यांनी ''त्यानंतर सन – १९६९ मध्ये वादी तसेच वादीच्या इतर बहिणींनी आपले हक्क त्यांचे भाऊ – अनंत, वसंत व रजनीकांत यांच्या लाभात भावांवरील प्रेमापोटी विनामोबदला तोंडी वर्दी देवुन महसुल दप्तरी सोडलेले होते'', असे नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे सदर वाद मुद्दयांमध्ये *'Plaintiff alongwith her other daughters'* ऐवजी ***'plaintiff alongwith her other sisters' have relinquished their rights without any consideration in the suit properties*** *असा अतिरिक्त मजकुर नमुद करुन* ***"Do defendants No. 01 and 04 prove that plaintiff alongwith her other sisters have relinquished their rights without any consideration in the suit properties ?"*** असा वादमुद्दा दुरुस्त करणे गरजेचे वाटते.

०४. सदरचे वादमुद्दे दुरुस्त केल्याने न्यायनिर्णय योग्य त्या वादमुद्दयांवर पारीत करणे सुलभ होईल. शिवाय, सदरचे वादमुद्दे दुरुस्त केल्याने दोन्ही पक्षकारांवर फार मोठा अन्याय होईल किंवा त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल, असे दिसुन येत नाही. सदरची दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीकोनातुन गरजेची आहे. शिवाय,

दुरुस्ती वादमुद्दयावर उभयपक्षकरांना अतिरिक्त पुरावा देण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीकोनातुन गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. निशाणी क्रमांक ५३ कडील वादमुद्दा क्रमांक ०५ व ०७ हे रद्द करण्यात येवुन खालीलप्रमाणे दुरुस्त वादमुद्दे नव्याने निश्चीत करण्यात येत असुन तशी दुरुस्ती मी निशाणी क्रमांक ५३ कडे आजच्या तारखेत करीत आहे –

5. ***"Does plaintiff prove that defendant Nos. 02 and 04 are causing obstruction to her peaceful possession over the Suit properties ?"***

*7.* ***"Do defendants Nos. 01 and 04 prove that plaintiff alongwith her other sisters have relinquished their rights without any consideration in the suit properties ?"***

२. अतिरिक्त वादमुद्दयांववर उभयपक्षकारांना पुरावा देण्याची संधी देण्यात येत आहे.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.17 18:15:53 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक १७/०३/२०२६ — दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,

देवरुख. — जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 17/03/2026 |
| Order signed by PO. on | :- | 17/03/2026 |
| Order uploaded on | :- | 17/03/2026 |